दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | शनिवार, 4 जुलै 2026 | अंक क्र. 60 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com



# दुधात भेसळ करणाऱ्यांनो सावधान !

## तुकाराम मुंढेंचा कडक इशारा; 'सेव्ह फूड, सेव्ह ड्रग' मोहिमेला प्रारंभ

■ मुंबई | वृत्तसंस्था

राज्यात दुधातील वाढत्या भेसळीवर आता अन्न व औषध प्रशासनाने (FDA) कठोर भूमिका घेतली आहे. "दुधात भेसळ करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही," असा स्पष्ट आणि कडक इशारा अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. याचबरोबर राज्यभर 'सेव्ह फूड, सेव्ह ड्रग' मोहिमेची घोषणा करत दूध उत्पादकांपासून विक्रेत्यांपर्यंत संपूर्ण दूध साखळीसाठी नवीन नियमावली लागू करण्यात आली आहे. पत्रकार परिषदेत बोलताना तुकाराम मुंढे म्हणाले की, दूध हा प्रत्येक कुटुंबाच्या आहारातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे ग्राहकांच्या थाळीपर्यंत सुरक्षित, शुद्ध आणि दर्जेदार दूध पोहोचणे ही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे. दुधातील भेसळ, कृत्रिम दूध निर्मिती आणि दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेबाबत सर्व संबंधितांनी नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक असेल.

नवीन नियम दूध संकलन केंद्र, दूध कुलिंग सेंटर, बल्क दूध विक्रेते, किरकोळ दूध विक्रेते तसेच पनीर, खवा, लोणी, क्रीम, चीज, आईस्क्रीम आणि इतर दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादक व विक्रेते यांना लागू असतील. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचा इशाराही मुंढे यांनी दिला. राज्यभरात अन्न साखळीची तपासणी करताना प्रशासनाला अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. त्यामध्ये दुधात पाण्याची भेसळ, रसायनांचा वापर करून कृत्रिम दूध तयार करणे, युरिया, डिटर्जंट, कॉस्टिक सोडा, स्टार्च, ग्लुकोज आणि मेलामाईनसारख्या आरोग्यास घातक रसायनांचा वापर, दूधातील फॅट व एसएनएफच्या मानकांचे उल्लंघन, शीतसाखळीचे नियम न पाळणे, विनापरवाना व्यवसाय करणे आणि चुकीचे लेबल लावून ग्राहकांची दिशाभूल करणे अशा गंभीर प्रकारांचा समावेश आहे.

### नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड नाही

दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ रोखण्यासाठी विद्यमान कायदे व नियमांची कठोर अंमलबजावणी केली जाणार असून, दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचा ठाम संदेश अन्न व औषध प्रशासनाने या मोहिमेद्वारे दिला आहे.

# श्री चैतन्य टेक्नो स्कूल, जोगाईवाडी येथे डॉक्टर्स डे साजरा

## अभ्यासासोबतच सामाजिक संस्कारही महत्त्वाचे : डॉ.राजेश इंगोले

■ अंबाजोगाई (प्रतिनिधी)

जोगाईवाडी येथील श्री चैतन्य टेक्नो स्कूलमध्ये डॉक्टर्स डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय संस्थेचे मुख्य विश्वस्त हणमंतराव मोरे हे होते. यावेळी प्राचार्या शैलेजा, संचालक मंडळाचे प्रा.हरीश व संतोष सोनवणे यांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अनेक शालेय विद्यार्थी डॉक्टर वेशभूषा करून कार्यक्रमात सहभागी झाले होते. सूत्रसंचालन श्रीमती पठाण यांनी केले, तर उपस्थितांचे आभार संतोष सोनवणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

**अभ्यासासोबतच सामाजिक संस्कारही महत्त्वाचे : डॉ.राजेश इंगोले**

आजच्या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी अभ्यासक्रम महत्त्वाचा आहेच, परंतु जीवनात यशस्वी माणूस घडण्यासाठी




सामाजिक उत्तरदायित्वाचा संस्कार शाळेतूनच विद्यार्थ्यांवर व्हायला हवा. आई ही मुलाची पहिली शाळा असते आणि शाळा ही दुसरी आई. त्यामुळे विद्यार्थ्यांना घडविण्याची मोठी जबाबदारी पालकांसोबत शिक्षकांवर आहे. डॉक्टर्स डे निमित्त शाळेने डॉक्टरांचा सत्कार करण्याचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगत ते पुढे म्हणाले की, समाजाप्रती जबाबदारीने काम करणाऱ्या डॉक्टरांचे कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे व त्यांचा सन्मान करणे हा संस्कार या कार्यक्रमातून मिळाला. सकारात्मक पालकत्व व सकारात्मक शिक्षक हेच विद्यार्थ्यांचे जीवन घडवू शकतात. त्यामुळे पालक व शिक्षकांनी आपली जबाबदारी ओळखून काम करावे. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ.इंगोले यांनी आवाहन केले की, आई-वडील आपल्यासाठी अहोरात्र कष्ट करतात. त्यांची अपूर्ण स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने कठोर मेहनत घ्यावी. केवळ ज्ञानी न होता संस्कारी व्हा. देशाप्रती, समाजाप्रती आपले कर्तव्य काय हे जाणणारा समाजच राष्ट्राला महासत्ता बनवतो. असे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले.

**प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष : प्राचार्या शैलेजा**

श्री चैतन्य टेक्नो स्कूलच्या देशभरात १००० तर महाराष्ट्रात ४० शाखा आहेत. अंबाजोगाईच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक परंपरेला साजेशी अशी ही शाळा आहे. येथे प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष देऊन अभ्यासासोबतच त्याच्या सुप्त गुणांना वाव दिला जातो असे प्राचार्या शैलेजा यांनी सांगितले.

**सामाजिक भावना वाढीस लागेल : हणमंतराव मोरे**

डॉक्टर्स डे साजरा करणे ही आनंदाची बाब आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजासाठी काम करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्याची भावना वाढीस लागेल असे संस्थेचे मुख्य विश्वस्त हणमंतराव मोरे म्हणाले.

# पालकांची लूट थांबणार !

## विशिष्ट दुकानातून पुस्तक खरेदीची सक्ती करणाऱ्या शाळांवर होणार कडक कारवाई

■ मुंबई (वृत्तसंस्था)

शाळेच्या पहिल्याच आठवड्यात विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तके आणि इतर साहित्य खरेदीसाठी पालकांची मोठी लगबग दिसून आली. मात्र, बहुतांशी खाजगी आणि स्वयंअर्थसहाय्यित शाळांनी विद्यार्थ्यांना आपल्याच शाळेतून किंवा ठराविक दुकानातून पुस्तके खरेदी करण्याची सक्ती केल्याचे पाहायला मिळाले. या विशिष्ट दुकानातून साहित्य खरेदीच्या सक्तीचा आणि पालकांच्या लुटीचा मुद्दा अखेर विधिमंडळात उपस्थित करण्यात आला. यावर उत्तर देताना शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी अशा शाळांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच, अशा मनमानी करणाऱ्या शाळांवर लक्ष ठेवण्यासाठी एका विशेष समितीची नेमणूक केली जाईल, अशी घोषणा शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सभागृहात केली.




राज्यातील अनेक खाजगी तसेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (CBSE) संलग्न शाळांकडून विद्यार्थ्यांना विशिष्ट दुकानातूनच साहित्य खरेदी करण्याची सक्ती करत पालकांची आर्थिक लूट केली जात आहे. विद्यार्थ्यांसाठी खाजगी शाळांमधून मोठ्या प्रमाणात वाढीव दराने वह्या व पुस्तकांची विक्री होत असून, सामान्य खाजगी दुकानांमधील किमती आणि शाळांनी ठरवून दिलेल्या ठिकाणच्या किमतीत मोठी तफावत असल्याचे समोर आले आहे.

याबाबत शासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे की, कोणत्याही शाळांनी विशिष्ट दुकानातून पुस्तक व साहित्य घेण्याबाबत पालकांवर सक्ती करू नये. शाळांमधून होणाऱ्या या लुटालुटीबाबत सभागृहात जोरदार चर्चा झाली आणि यावरून मोठा गोंधळ देखील उडाला.

शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी लेखी उत्तरातून माहिती दिली की, अशा सक्तीबाबत पालकांकडून तक्रारी प्राप्त झाल्यास शालेय शिक्षण विभागाकडून थेट आणि कडक कारवाई करण्यात येईल.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या काही शाळांना आधीच नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच, शाळांच्या या मनमानी कारभाराला चाप लावण्यासाठी आणि त्यांच्यावर कडक पाळत ठेवण्यासाठी विशेष समितीची घोषणा राज्यमंत्री पंकज भोयर यांनी केली आहे.

# कर्जमाफीच्या लाभार्थ्यांना मोठा दिलासा

## थकबाकीवर व्याज न आकारण्याचे शासनाचे स्पष्ट आदेश!

■ पुणे (वृत्तसंस्था)

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना सरकारने मोठा दिलासा दिला आहे. योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होई पर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (DCCB) तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी (PACS) पात्र थकीत पीककर्जाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी करू नये, असे स्पष्ट आदेश सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने जारी केले आहेत. मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

■ **३० जून २०२५ पर्यंतच्या थकबाकीदारांना लाभ**

शासन निर्णयानुसार ३० जून २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पात्र पीककर्जे या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात आली आहेत. अशा पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. ज्या शेतकऱ्यांचे कर्ज दोन लाखांपेक्षा अधिक आहे, त्यांना अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर 'एकवेळ समझोता योजनेचा' (OTS) लाभ दिला जाईल. तसेच, नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभही



देण्यात येणार आहे. या योजनेत अल्पमुदतीची पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित पीककर्जांचाही समावेश करण्यात आला आहे.

■ **अतिरिक्त आर्थिक भार रोखण्यासाठी पाऊल**

योजनेच्या अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती (SOP) निश्चित करण्यात आली आहे. याअंतर्गत पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे, कर्जखात्यांचे पडताळणीकरण, आधार प्रमाणीकरण आणि त्यानंतर कर्जमाफीची रक्कम संबंधित कर्जखात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे.

त्यामुळे कर्जमाफीची रक्कम खात्यात जमा होण्यापूर्वी जर बँकांनी शेतकऱ्यांच्या कर्जावर व्याज आकारले, तर त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. हीच बाब लक्षात घेऊन पात्र शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी लाभ मिळेपर्यंत थकीत पीककर्जाच्या रकमेवर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

■ **नवीन कर्ज मिळणे होणार सुलभ**

या आदेशामुळे पात्र शेतकऱ्यांच्या थकबाकीत अनावश्यक वाढ होणार नाही. परिणामी, कर्जमुक्तीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध होण्याचा मार्ग अधिक सुलभ आणि मोकळा होणार आहे. कर्जमुक्ती योजनेची पारदर्शक आणि परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी, असे शासनाने स्पष्ट केले आहे.

# रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना

## पहिल्याच बैठकीत आकराशे अर्जांना मंजुरी

■ लातूर प्रतिनिधी

रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीची बैठक लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या सूचनेनुसार २ जुलै रोजी घेण्यात आली असून समितीचे अध्यक्ष सतीश आंबेकर यांच्या अध्यक्षतेत झालेल्या पहिल्याच बैठकीत तब्बल ११४६ अर्जांना मान्यता देण्यात आली आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती १३ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार सतीश आंबेकर यांच्या अध्यक्षतेत गठीत करण्यात आली आहे. दीड महिन्यापूर्वी गठीत झालेल्या या समितीस तातडीने बैठक घेऊन गोरगरीब, सर्वसामान्य गरजू लाभधारकांना, निराधारासह विधवा, अपंगांना लाभ द्यावा अशी सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी केली होती. सदरील सूचनेनुसार २ जुलै रोजी रेणापूर तहसील कार्यालयात समिती अध्यक्ष सतीश आंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

या बैठकीत १३८४ अर्ज ठेवण्यात आले होते त्यापैकी ११४६ अर्जांना मंजुरी देण्यात आली तर उर्वरित त्रुटी असल्याने २३८ अर्ज नामंजूर करण्यात आले. प्रारंभी समिती सचिव तथा तहसीलदार प्रशांत थोरात यांनी समिती



अध्यक्षासह सर्व सदस्यांचा सत्कार करून स्वागत केले. तर समितीच्या वतीने सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्याचा सत्कार केला.

रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या बैठकीस समितीचे अध्यक्ष सतीष रावसाहेब आंबेकर, सचिव तथा तहसीलदार प्रशांत थोरात, सहा. गोविंद काळे, समिती सदस्य ललीता कांबळे, कस्तुराबाई माने, विठ्ठल कसपटे, संजय चव्हाण, गोविंदराव देशमुख, सदानंद पिंपळे, विरेन्द्रसिंह चौहान, सतिश जाधव, सुरेश बुड्डे यांच्यासह महसूल सहाय्यक गुलाब काळे, तुकाराम जाधव माहिती तंत्रज्ञान सहाय्यक विठ्ठल राठोडे आदी होते.




# सासवडच्या वाघीरे विद्यालयाचा विद्यार्थी वेदांत साबळे शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात पाचवा

■ सासवड, पुणे (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा राज्यात आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेचा दि. २ जुलै २०२६ रोजी जाहीर झाला असून इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत सासवड येथील वाघीरे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाचा वेदांत साबळे या विद्यार्थ्याचा ३०० पैकी २८४ गुण मिळवून गुणवत्ता यादीत राज्यात पाचवा क्रमांक आला आहे. तसेच यापूर्वी त्याची सैनिक स्कूल सातारा व नवोदय विद्यालय पुणे येथे प्रवेशासाठी निवड झाली आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयातील एकूण ५१ विद्यार्थी पात्र झाले असून अनन्या भिसे (मिळालेले गुण २४२), पूर्वा रासकर (२४०), सार्थ शिंदे (२३६), आरुष राऊत (२२६),अनुराज चाचर (२२४), शुभ्रा जगताप (२२४) व स्वराज पवार (२१८) हे सात विद्यार्थी पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत आले असून एकूण आठ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयातील एकूण ८ विद्याथी पात्र झाले असून सिद्धी गजरे (२५८), अनघा जगताप (२२२) व सर्वेश लवांडे (२२२) हे तीन विद्यार्थी पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत असून शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन, मुख्याध्यापकांचे नियोजन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरल्याचे विद्यालयाचे शिक्षक शिवहार लहाने यांनी सांगितले. चाचण्यांचे नियमित आयोजन करण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि यशाचा आलेख उंचावत असल्याचेही त्यांनी सांगितले. शाळेत राबविण्यात येणारे विशेष मार्गदर्शन आणि शिक्षकांच्या अथक परिश्रमांमुळेच हे यश मिळाल्याचे विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र कांबळे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल शाला समिती अध्यक्ष राहुल मिरासदार, महामात्र सुधीर भोसले, मुख्याध्यापक राजेंद्र कांबळे, उपमुख्याध्यापक शंतनू सुरवसे, पर्यवेक्षिका अर्चना लडकत यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. या विद्यार्थांना इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यालयातील शिक्षक शिवहार लहाने, अप्पासाहेब कोकरे, गणेश पाठक,प्रज्ञा पोटेगावकर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. तर इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रशालेतील शिक्षक मंगल कोकरे, प्रमोद ठुबे, दिपाली लांडगे, गौरी ढगे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## नागपूरच्या विकासाला नवे पंख

नागपूरच्या १०९ वर्षांच्या ऐतिहासिक विमानतळाच्या विकासाला आता नवे पंख लाभणार आहेत. 'जीएमआर एअरपोर्ट्स'कडे विस्तारीकरणाची जबाबदारी सोपविल्याने २०२९ पर्यंत ते देशातील महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक आणि कार्गो हब म्हणून उदयास येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विस्तारीकरण कार्यक्रम हाती घेण्यासाठी विमानतळ जीएमआर एअरपोर्ट्स या हवाई व्यवसायातील पायाभूत सुविधा उभारणाऱ्या कंपनीकडे सोपवण्यात आले आहे. त्यामुळे पुढील तीन वर्षांत हे विमानतळ आंतरराष्ट्रीय हवाई वाहतुकीचे एक केंद्र बनल्याशिवाय राहणार नाही. नुकत्याच झालेल्या एका समारोहात हे विमानतळ समूहाकडे हस्तांतरित करण्यात आले. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,(Devandra fadnavis)) केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू, जीएमआर एअरपोर्ट्सचे अध्यक्ष जी. बी. एस. राजू, खा. प्रफुल्ल पटेल, खा. माया इवनाते, नागपूरच्या महापौर नीता ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

नागपूरचे विमानतळ जवळजवळ १०९ वर्षे जुने विमानतळ आहे. मिळालेल्या माहितीनुसार १९१७-१८ मध्ये तत्कालीन इंग्रज सरकारने लष्करी वाहतुकीसाठी रॉयल डिफेन्स सर्विस नावाची सेवा सुरू केली होती. त्यासाठी नागपूरजवळ असलेल्या सोनेगाव परिसरात हे विमानतळ उभारण्यात आले होते. सुरुवातीला या विमानतळाचा उपयोग फक्त लष्करी कामासाठीच केला जात होता. त्यावेळी नागपूर जवळच असलेल्या कामठीमध्ये लष्कराचा एक तळ होता. त्यासाठी हे विमानतळ वापरले जात होते. १९५३ पासून मात्र नागरी विमान वाहतूक या विमानतळावरून सुरू झाली होती. नागपूर हे देशाचे मध्यवर्ती ठिकाण आहे. त्यामुळे सुरुवातीच्या काळात पोस्टाची डाक वाहून नेणारी विमाने नागपूरला थांबत असत आणि इथे बाकीची देवाणघेवाण केली जात असे. त्यामुळे त्या काळात नागपूर विमानतळावर सर्व विमाने मध्यरात्रीच यायची. १९६९ मध्ये नागपुरात नागपूर विरुद्ध न्यूझीलंड यांचा कसोटी क्रिकेट सामना झाला होता. त्यावेळी दोन्ही कसोटी संघाचे खेळाडू मध्यरात्रीच नागपूरच्या विमानतळावर उतरले होते. १९६३ मध्ये नागपूरला हवाई दलाचे एअर फोर्स मेंटेनन्स कमांड सुरू झाले. त्यामुळे नागपूरच्या सोनेगाव विमानतळाचे महत्त्व अधिकच वाढले.

त्याच काळात नागपूरजवळ भंडारा येथे ऑर्डनन्स फॅक्टरी सुरू झाली होती, तर वर्धा जिल्ह्यात पुलगाव येथे स्फोटकांचा डेपोही उभारण्यात आला होता. या सर्वच प्रकल्पांसाठी नागपूर विमानतळाचा उपयोग होऊ लागला होता. हळूहळू प्रवासी आणि मालवाहतूकही वाढू लागली. दिवसाला एक विमान मुंबईचे तर एक विमान दिल्लीचे असे जाऊ लागले. याशिवाय मान्यवरांची विशेष विमाने इथेच उतरवली जाऊ लागली. असे असले तरी नागपूरचे विमानतळ हे या काळात अगदी छोट्याशा इमारतीत बसलेले होते. मात्र १९९० नंतर विमानतळाचे विस्तारीकरण सुरू झाले. विमानतळ मोठ्या इमारतीत गेले. नागपुरातून मुंबई आणि दिल्लीसह इतरही मोठ्या शहरांमध्ये विमान वाहतूक सुरू झाली. २००२ मध्ये नागपूरला आंतरराष्ट्रीय कार्गो हब सुरू करण्याचा निर्णय झाला. तिथून विमानतळाच्या विस्तारीकरणाला अधिकच वेग आला. २००५ मध्ये नागपूरहून दुबई आणि शारजा येथे आंतरराष्ट्रीय फेऱ्यासुद्धा सुरू झाल्या. हळूहळू नागपूरचे महत्त्व वाढत होते. २००८ मध्ये या विमानतळाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्यात आले. आज या विमानतळावरून दिवसाला जवळजवळ ३५ ते ४० विमानांचे उड्डाण होत असते आणि त्याचबरोबर लँडिंग देखील होते. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी ही परिस्थिती बदलायची ठरवली. त्यांनी कार्गो हबच्या पूर्ततेसाठी प्रयत्न सुरू केले आणि त्याचबरोबर ही सर्व विमाने इथे थांबून जर पुढे गेली तर विदर्भाच्या अर्थकारणाला नवी चालना मिळेल असा विचार त्यांनी केला आणि त्यादृष्टीने पावलेही उचलली.

## रेडीमिक्स कॉँक्रीट प्रकल्पांवर प्रदूषण नियंत्रणासाठी कठोर अंमलबजावणी

■ मुंबई : प्रतिनिधी

पुणे शहरातील रेडीमिक्स कॉँक्रीट प्रकल्पांमुळे मुठा नदीचे प्रदूषण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका येथे बैठक घेऊन नदी पुनर्जीवन प्रकल्प, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प तसेच आरएमसी प्रकल्पांच्या प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या प्रकल्पांवर सातत्याने कारवाई केली जात असून, यापुढेही नियमित बैठका घेऊन परिस्थितीवर लक्ष ठेवले जाईल, असे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

यासंदर्भात विधानपरिषद सदस्य डॉ. परिणय फुके यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावरील चर्चेत डॉ. नीलम गोऱ्हे, प्रवीण दरेकर आणि विक्रम काळे यांनी सहभाग घेतला.पर्यावरण मंत्री मुंडे म्हणाल्या की, पुण्यातील १०५ आरएमसी प्रकल्पांपैकी सर्व प्रकल्प बंद करण्यात आलेले नसून, केवळ नियमांचे पालन न करणारे, बेकायदेशीरपणे कार्यरत किंवा प्रदूषण नियंत्रणाच्या अटींचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांवरच कारवाई करण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आरएमसी प्रकल्पांसाठी नवीन मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. त्यानुसार सर्व प्रकल्पांना बंदिस्त (बॉक्स कव्हर) व्यवस्था, धूळ नियंत्रणासाठी स्प्रिंकलर, वाहनांच्या टायर धुण्याची व्यवस्था आणि इतर प्रदूषण नियंत्रण उपाययोजना बंधनकारक करण्यात आल्या आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न करणाऱ्या प्रकल्पांवर कठोर कारवाई केली जाईल. मुठा नदीच्या प्रदूषणासाठी केवळ आरएमसी प्रकल्पच जबाबदार नसून सांडपाणी हेही मोठे कारण असल्याचे नमूद करत त्यांनी सांगितले की, नदी प्रदूषण कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर एसटीपी उभारण्याचे काम सुरू आहे. पाण्याच्या गुणवत्तेचे ऑनलाईन निरीक्षणही करण्यात येत आहे. असेही मंत्री मुंडे यांनी नमूद केले. पर्यावरण विभागाकडून प्रदूषण करणाऱ्या उद्योगांना वेळोवेळी नोटिसा दिल्या जात असून, नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच प्रदूषण नियंत्रण अधिक प्रभावी करण्यासाठी उद्योगांच्या बँक गॅरंटीची रक्कम वाढविण्याबाबत समितीमार्फत धोरण तयार करण्यात येत असून, अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश असलेले व्यापक धोरणही तयार करण्यात येत असल्याचे मंत्री मुंडे यांनी सांगितले.

## रेड व ऑरेंज झोनमधील उद्योगांबाबत बैठक घेणार

■ मुंबई : प्रतिनिधी

ठाणे जिल्ह्यात रेड आणि ऑरेंज झोनमधील उद्योगांची संख्या जास्त आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील रेड व ऑरेंज झोनमधील उद्योगांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाच्या प्रश्नांवर लवकरच बैठक घेण्यात येईल असे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.याबाबत सदस्य सुनील शिंदे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य प्रमोद जठार, अनिल परब, ज्ञानेश्वर म्हात्रे, भाई जगताप यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, वाढत्या प्रदूषणाच्या तक्रारींची दखल घेत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) मध्ये मनुष्यबळ वाढविण्याची प्रक्रिया सुरू असून, आवश्यकतेनुसार नियमित व कंत्राटी पदांवर भरती केली जाणार आहे. प्रदूषणाबाबत जनजागृती वाढल्यामुळे तक्रारींमध्ये मोठी वाढ झाली आहे. या तक्रारींवर तातडीने कारवाई करण्यासाठी सध्या उपलब्ध कर्मचारी अपुरे पडत असून, एमपीसीबीमध्ये अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. बँक गॅरंटीच्या संदर्भात कोणताही गैरप्रकार आढळलेला नसल्याचे सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन आणि खाते ते खात्याद्वारे होत असल्याने अनियमिततेची बाब निदर्शनास आलेली नाही.कॉमन एफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट (सीईटीपी) ही व्यवस्था सहकार विभागाऐवजी एमआयडीसीमार्फत चालविली जाते.

लहान आणि मध्यम उद्योगांना स्वतंत्र सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्यामुळे सामूहिक प्रक्रिया केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये हीच पद्धत राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## सर्पदंश प्रतिबंध संदर्भात उपचार व जनजागृती

■ मुंबई प्रतिनिधी

राज्यात सर्पदंशामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी जनजागृती, वेळेवर उपचार, अँटी स्नेक व्हेनमची उपलब्धता आणि विविध विभागांमधील समन्वय अधिक प्रभावी करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली.सदस्य विक्रम पाचपुते यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते बोलत होते. या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेत सदस्य श्वेता महाले, बाबासाहेब देशमुख, अर्जुन खोतकर, जयंत पाटील यांनी सहभाग घेतला.

मंत्री आबिटकर म्हणाले की, इंडियन काऊन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आयसीएमआर) यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये अँटी स्नेक व्हेनमची उपलब्धता सुनिश्चित करण्यात आली आहे. तसेच वैद्यकीय कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले असून ग्रामपंचायत स्तरापर्यंत जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. सर्पदंशानंतर भीतीमुळेही अनेकदा गंभीर परिणाम होतात. त्यामुळे रुग्णांनी 'गोल्डन अवर्स'मध्ये रुग्णालयात पोहोचणे अत्यंत महत्त्वाचे असून याबाबत व्यापक जनजागृती केली जाईल, असे त्यांनी सांगितले.सर्पदंशाला अधिसूचित (नोटिफाईड) आजारांच्या यादीत समाविष्ट करण्याबाबत विधि व न्याय विभागाकडे प्रस्ताव पाठविण्याचा निर्णयही राज्य शासनाने घेतल्याची माहिती त्यांनी दिली. सध्या राज्यात अँटी स्नेक व्हेनमचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. प्रशिक्षणासाठी निधीची तरतूद करण्यात आली असून प्रशिक्षण प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. कुठे त्रुटी आढळल्यास त्या तातडीने दूर केल्या जातील, असेही त्यांनी सांगितले. सर्पदंश विषारी आहे की नाही हे अल्पावधीत ओळखण्यासाठी 'अँटी स्नेक व्हेनम किट' उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला असून हे किट प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वितरित करण्यात येत आहेत. त्यामुळे उपचाराची दिशा त्वरित निश्चित होऊन रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.मंत्री आबिटकर यांनी, सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामपंचायतींमध्ये जनजागृतीची माहिती प्रदर्शित करणे बंधनकारक असून त्यात त्रुटी आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असे सांगितले. तसेच पावसाळ्यात सर्पदंशाच्या घटनांचे प्रमाण वाढत असल्याने आरोग्य यंत्रणांना सतर्कतेच्या सूचना देण्यात येणार असून आवश्यक तेथे अतिदक्षता उपचार सुविधा उपलब्ध करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाशी समन्वय साधला.

## आरोग्य व विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई

■ नवी मुंबई प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सार्वजनिक रुग्णालय, ऐरोली, येथे 30 जून रोजी सोनम डोंगरे व रिचा मिश्रा या 08 महिन्यांच्या 02 गर्भवती महिला दाखल झाल्या होत्या. 30 जून रोजी दोन्ही रूग्णांना Inj. Duvadilan व Inj. Dexa Methasone दिले होते. 01 जुलै रोजी सोनम डोंगरे यांना Inj. Dexa Methasone देण्यात आले व रिचा मिश्रा यांना Inj. Duvadilan व Inj. Dexa Methasone देण्यात आले होते. सोनम डोंगरे व रिचा मिश्रा यांची प्रकृती गंभीर झाली. तद्नंतर महानगरपालिका रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना व्हेंटीलेटरवर ठेवून स्थिर करण्याचा प्रयत्न केला. मात्र उपचारादरम्यान सोनम डोंगरे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

सदरचा मृत्यू डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झाला असल्याचे रुग्णांच्या नातेवाईकांचे म्हणणे असल्याने सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याकरीता दि.01 जुलै 2026 रोजीच्या आदेशान्वये जिल्हा शल्यचिकित्सक ठाणे, सर ज.जी. समूह रूग्णालये व ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई येथील स्त्रीरोग व प्रसूती विभाग प्रमुख आणि नवी मुंबई स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र संघटनेचे प्रतिनिधी तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नमुंमपा यांची चौकशी समिती नेमून 15 दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.तसेच सदर दोन्ही इंजेक्शनचा वापर तात्काळ थांबविण्यात आला असून सदर सर्व इंजेक्शन्स सिलबंद केले असून त्याचे नमुने अन्न व औषध प्रशासन, ठाणे यांचेकडे पुढील तपासणीसाठी पाठविले आहेत. उपरोक्त चौकशी समितीचा अहवाल येईपर्यंत राजमाता जिजाऊ रुग्णालय, ऐरोली येथील सदर रुग्णांवर उपचार करणा-या डॉ. भावना पगारे, स्त्रीरोग तज्ञ यांना दि.02 जुलै 2026 रोजीच्या आदेशान्वये सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. सोनम डोंगरे यांचे शवविच्छेदन कुटुंबाच्या विनंतीनुसार सर ज.जी.समूह रूग्णालये व ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई येथे करण्यात येत आहे. तर रिचा मिश्रा यांच्यावर फोर्टीस रूग्णालय, वाशी येथे उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे वैद्यकीय अधीक्षक, सा.रू.वाशी नमुंमपा यांनी कळविले आहे. अशाचप्रकारे 1 जुलै रोजी नेरुळ एल.पी. नाका पुलाखालील रस्त्यावर विद्युत पुरवठा करणा-या केबलचा पावसाच्या पाण्याशी संपर्क आल्यामुळे तेथून पायी जात असलेल्या दोन विद्यार्थीनींना विद्युत धक्का बसून अपघात घडला असल्याची माहिती महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षास मिळाली. दरम्यान दोन्ही विद्यार्थीनींना नागरिकांनी जवळच्या डी.वाय.पाटील रूग्णालयात दाखल केले.

त्यांची प्रकृती स्थिर झाल्यानंतर त्यांना अतिदक्षता विभागात निगराणीसाठी फोर्टीस रूग्णालय, वाशी येथे दाखल केले आहे. वैद्यकीय अधीक्षक, सा.रू.वाशी यांच्या अहवालानूसार दोन्ही विद्यार्थीनींची प्रकृती स्थिर आहे.या प्रकरणी प्रथमदर्शनी विदयुत विभागाचा हलगर्जीपणा असल्याचे आढळून आल्यामुळे 2 जुलै 2026 रोजीच्या आदेशान्वये प्रविण हिंदूराव गाडे, कार्यकारी अभियंता (विद्युत) यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विदयुत निरीक्षक, उदयोग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग ठाणे-1 यांची नियुक्ती केली आहे. सदयस्थितीत पहिल्या घटनेतील रिचा मिश्रा व दुसऱ्या घटनेतील दोन विद्यार्थिनी या फोर्टीज हॉस्पीटल, वाशी येथे दाखल असून त्यांच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा होत आहे. तसेच त्यांच्यावरील उपचाराचा खर्च नवी मुंबई महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार आरोग्य व विद्युत विभागातील संबंधित अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# कामगार श्रम संहितेविरोधात कामगार संघटनांचा आक्रोश

मुंबई |



कशासाठी......पोटासाठी राब राब राबणारा कामगार मग तो सफाई कामगार असो किंवा एखादा मजूर अंगणवाडी सेविका असो किंवा बेस्ट कामगार.किंवा एखादी धुणीभांडी करणारी बाई असो देशभरात हातावर पोट असलेल्या अशा असंघटित कामगारांची संख्या ही लाखोमध्ये आहे. भारतीय कामगार चळवळीच्या इतिहासात कामगारांनी अनेक दशकांच्या संघर्षातून सामाजिक,आर्थिक आणि रोजगार संरक्षणाचे हक्क कायद्यानुसार मिळवलेले आहेत. परंतु कष्टकऱ्यांच्या याच न्याय हक्काच्या कायद्यांच्या विरोधात जाऊन केंद्र आणि राज्य सरकार 29 जुन्या कामगार कायद्यांचे एकत्रीकरण करून केवळ 4 श्रम संहिता तयार करून कामगारांचे हक्क डावलण्यांचे काम करीत आहे. अर्थातच एक अर्थाने कामगारांची आर्थिक सामाजिक आणि औद्योगिक सुरक्षा संपविण्याचा घाट या सरकारने घातलेला आहे.म्हणूनच सरकारच्या या अन्यायी धोरणाविरोधात देशातील श्रमिक कामगार संघटनांनी एकत्र येऊन मुंबईतील आझाद मैदानात धरणे आंदोलन सुरू केले आहे.

केंद्र आणि महाराष्ट्र शासनाने जुन्या 29 कामगार कायद्याचे मसुदा नियम बदलून महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, कामगारांनी खाण, विभाग द्वारा महाराष्ट्र वेतन संहिता, महाराष्ट्र औद्योगिक संबंध संहिता, महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य संहिता आणि महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा अशा 4 श्रम संहिता तयार करून या चार संहितामध्ये कामगार कायद्यांचे एकत्रीकरण करण्याचा घाट घातलेला आहे जो कामगारांच्या हक्काच्या आणि लोकशाहीच्या तत्वाच्या देखील विरोधात आहे.भारतीय राज्य घटनेच्या काही कलमानुसार कामगारांच्या संरक्षणाची हमी देण्यात आली आहे.तसेच भारत हा आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा संस्थापक सदस्य देश असल्याने कामगार माणकांचे पालन करणे भारतचे कर्तव्य आहे.सरकारच्या नव्या श्रम संहितामुळे कामगारांच्या अधिकाराचे आणि रोजगार नियमाचे देखील उल्लंघन होत आहे.म्हणूनच केंद्र आणि राज्य सरकारच्या या धोरणाविरोधात राष्ट्रीय श्रमिक संघटना आज आंदोलन करत आहे सरकारने या श्रम संहितांचे एकत्रीकरण थांबवून कामगार कायदे कायम लागू करावेत अशी सरकारकडे आमची मागणी असल्याचे महाराष्ट्र इंटकचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

सध्या भारतातील सरकार मोठ्या उद्योगसमूहना आणि बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच जागतिक वित्तीय संस्थांच्या दबावाखाली कामगार धोरणे तयार करत आहेत.नव्या कामगार धोरणामध्ये मालकांना नव्या नियमासंदर्भात मुभा दिली जात आहे मात्र सदर चार श्रम संहिता नियम कामगारांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे , रोजगार आणि सुरक्षितता वाढविणारे आणि मालकधार्जीन असल्याने ते कामगारांच्या हक्कांच्या विरोधात आहे.हे सरकार जी मनुस्मृती आंबेडकरांनी जाळली होती त्याचे आणि लोकशाहीचे अर्धवट नियम घेऊन धोरणे आखते आहे ही दुहेरी भूमिका चुकीची आणि कामगारांवर अन्याय करणारी आहे.असे मत आयटेक चे सुकुमार दामले यांनी व्यक्त केले.

भारताने आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अनेक मूलभूत तत्त्वांचा स्वीकार केला आहे. संघटन स्वातंत्र्य, सामूहिक सौदेबाजी, कामगारांचे संरक्षण आणि सन्मानजनक रोजगार या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात जाणाऱ्या कोणत्याही नियमांची अंमलबजावणी करणे आंतरराष्ट्रीय बांधिलकीच्या विरोधात आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता कामगारविरोधी, संघटनविरोधी व मालकधार्जिणे असून ते भारतीय राज्यघटनेतील सामाजिक न्याय, समता व कामगार संरक्षणाच्या मूलभूत तत्त्वांना बाधा पोहोचविणारे आहेत. त्यामुळे महाराष्ट्र शासनाचे नियम मान्य नाहीत.असे भारतीय कामगार सेनेचे संतोष चाळके यांनी सांगितले.

कामगार कर्मचारी संयुक्त कृती समितीच्या माध्यमातून सरकारच्या 4 श्रम संहितेविरुद्ध सुरू असलेल्या या धरणे आंदोलनात इंटक, एच एम एस आयटेक, सिटू, भारतीय कामगार सेना, बँक, गिरणी कामगार, अंगणवाडी सेविका,घरेलु कामगार, आशा सेविका,शिक्षक ,सफाई कामगार अशा तमाम संघटना सहभागी झाल्या असून एच एम एस चे प्रदेशाध्यक्ष निवृत्ती धुमाळ, कार्याध्यक्ष अशोक जाधव सिटू चे विवेक मॉंटेरो आणि कामगार नेते बजाज यांनी आपला पाठिंबा दर्शविला आहे

सरकारने चालू अधिवेशनात कामगारांच्या या न्याय हक्काच्या प्रश्नाकडे तातडीनं लक्ष घालून या कामगार विरोधी चार श्रम संहिता रद्द करून कामगारांच्या हिताचे जुने कायदे आणि नियम पूर्ववत करावेत अशी मागणी यांनी केली.

# पवारवाडी एनएसएल शुगर कारखान्याच्या रासायनिक सांडपाण्याने टाकळी तांडा परिसरातील भूजल दूषित

## बाळासाहेब सोनटक्के; हारीष जाधव यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे तातडीच्या कारवाईची मागणी

माजलगाव | प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील पवारवाडी येथील एनएसएल शुगर कारखान्याकडून रासायनिक मिश्रित सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता शेतजमिनीत सोडले जात असल्याने हनुमान नगर टाकळी तांडा व परिसरातील भूजल पूर्णपणे दूषित झाले असून नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाल्याचा आरोप करत जिल्हाधिकाऱ्यांकडे पोलीस बॉईज असोसिएशन चे धारुर तालुका अध्यक्ष बाळासाहेब सोनटक्के व पोलिस बॉईज असोसिएशन माजलगाव तालुका अध्यक्ष हारीष जाधव यांनी निवेदनाद्वारे तक्रार देण्यास आली आहे. या प्रकरणी तातडीने चौकशी करून कारखान्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.




निवेदनात म्हटले आहे की, कारखान्यातून सोडण्यात येणारे दूषित पाणी जमिनीत मुरल्यामुळे परिसरातील बोअरवेल, विहिरी आणि पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दूषित झाले आहेत. बोअरवेलमधून काळपट, पिवळसर व दुर्गंधीयुक्त पाणी येत असून ते पिण्यास तर अयोग्य आहेच, पण घरगुती वापरासाठीही योग्य राहिलेले नाही. दूषित पाण्यामुळे नागरिकांना पोटाचे विकार, त्वचारोग तसेच विविध संसर्गजन्य आजार होत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. उपचारांवरील वाढत्या खर्चामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकटही ओढवले आहे.

यापूर्वीही तहसील कार्यालयासह संबंधित प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेच्या तपासणीत संबंधित पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे नमूद करण्यात आल्याचा उल्लेखही निवेदनात आहे. दूषित पाण्यामुळे जनावरे आजारी पडत असून काहींचा मृत्यू झाल्याचाही दावा करण्यात आला आहे. तसेच एका शेतकऱ्याचा दूषित पाण्याच्या तणावामुळे हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दूषित पाण्याची पुन्हा तपासणी करावी, जबाबदार असलेल्या एनएसएल शुगर कारखान्यावर कायदेशीर कारवाई करावी आणि नागरिकांना सुरक्षित पिण्याच्या पाण्याची तातडीने व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही निवेदनाद्वारे पोलीस बॉईज असोसिएशन चे धारुर तालुका अध्यक्ष बाळासाहेब सोनटक्के व पोलिस बॉईज असोसिएशन चे माजलगाव तालुका अध्यक्ष हारीष जाधव यांनी निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या हिसकावणारी टोळी केली जेरबंद





जालना | जालना शहरासह परिसरात महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या हिसकावून दहशत माजविणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. चोरीचे सोने खरेदी करणाऱ्या सराफालाही पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपींकडून ३ लाख ७० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चार दिवसांपासून एलसीबी पथक आरोपींच्या मागावर होते. १ जुलै रोजी जालना शहरातील विविध भागातून साखळी चोरीच्या अजय गांगुर्डे चैतन्य गायकवाड शुभम वैद्य सुमीत रुपेकर तीन घटना घडल्या होत्या. तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती, सीसीटीव्हीच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा माग काढून त्यांना ताब्यात घेतले. सुमीत सुभाष रुपेकर, चैतन्य कैलास गायकवाड, शुभम वसंत वैद्य (साजापूर ता. जि.छत्रपती संभाजीनगर), अजय रोहीदास गांगुर्डे (रांजणगाव ता. गंगापुर), अजय अरुण लोळगे (संभाजी कॉलनी एन ६ सिडको, छत्रपती संभाजीनगर) अशी ताब्यात अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. ही कारवाई पीआय पंकज जाधव यांनी एपीआय सचिन खामगळ, राजेंद्र वाघ, गोपाल गोशीक, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, लक्ष्मीकांत आडेप, संदीप चिंचोले, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, सतीष श्रीवास यांनी आरोपींना अटक केली.

# प्लेन साडीला आकर्षक बॉर्डर



साध्या रंगातली प्लेन साडीही आकर्षक बॉर्डरमुळे अतिशय खुलून दिसते. साडी आकर्षक बनविण्यासाठी सुरेख बॉर्डर खुप महत्त्वाची भूमिका निभावते. बॉर्डरचे वेगवेगळे प्रकार असून त्यांचा वापर करुन आपल्या साडीला एकदम हटके रुप देता येऊ शकेल.

### जर्दोसी बॉर्डर

यामध्ये सोनेरी आणि चंदेरी धाग्यांचा वापर करुन आकर्षक भरत काम केले जाते. काही वेळेला मोती, खडे यांचा वापर करुन डिझाईन अधिक आकर्षक बनवली जाते. यामध्ये हलके आणि क्लासिक असे दोन प्रकार असतात. स्वतातल्या जर्दोसीचे भरपूर प्रकार मिळतात. पण ते तितकेसे आकर्षक नसतात. खरी जर्दोसी अतिशय सुंदर आणि दर्जेदार असते. ती बनविण्यासाठी मोठे कौशल्य ही लागते. काळ्या प्लेन साडीवर जर्दोसी बॉर्डर म्हणजे उंची पसंतीचा नमुना म्हटला पाहिजे.

### कांथा एम्ब्रॉयडरी बॉर्डर

या प्रकारची एम्ब्रॉयडरी म्हणजे बंगाली कलेचा नमुना होय. यामध्ये योग्य रंग-संगती महत्त्वाची असते. प्लेन साडीवर विशिष्ट प्रकारच्या डिझाईनमध्ये धावदोरा घालून कांथा वर्क केले जाते. यासाठी कॉटन, टसर सिल्क साड्या वापरल्या जातात. बॉर्डर सोबतच पदरावरही असे भरतकाम केले जाते.

### सिक्विन वर्क

सिक्विन म्हणजे धातुचे लहान बिड् स होय. हे बिड्स दोऱ्यामध्ये ओवून सुंदर नक्षीकाम केले जाते. बॉर्डरसाठी केलेले सिक्विनचे वर्क फारच आकर्षक दिसते. सिक्विनवर्कमुळे साधी साडी सुद्धा हटके दिसू लागते.

### कुंदन बॉर्डर

कुंदन म्हणजे खड्यासारखा प्रकार असून तो साडीवर चिकटवला जातो. राजस्थानमध्ये तो प्रकार अतिशय लोकप्रिय आहे. पांढरे किंवा रंगीत कुंदन घेऊन त्यापासून आकर्षक डिझाईन बनविले जाते. फक्त कुंदनचे डिझाईन किंवा इतर प्रकारच्या एम्ब्रॉयडरी सोबत विशिष्ट प्रकारे कुंदनचा वापर केला जातो. जॉर्जेटच्या साडीवर जरीवर्क सोबत कुंदनचा वापर केल्यास फारच छान दिसते.





आपण काही फॅशन डिझायनर नाही; पण थोडीशी कलात्मकता वापरली की आपली साडी, ड्रेस आपण छान सजवू शकतो आणि ती सजवण्यासाठी एखादी आयती वस्तू हातात असेल तर आणखी उत्तम. हल्ली बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे कलाकुसर केलेले पॅचवर्क मिळतात, ते वापरून तुम्ही ड्रेस सजवू शकता. काही वर्षापूर्वी बाजारात कलाकुसर केलेल्या लेस यायला सुरुवात झाली. या लेसवर वेगवेगळ्या प्रकारचे भरतकाम केले जायचे. एखाद्या ड्रेसवर या लेस लावल्या की ड्रेसची शोभा वाढायची. त्यामुळे पंजाबी ड्रेसवरच नाही तर साड्यांवर देखील लेस लावण्याचा ट्रेंड आला. प्लेन साडी घेतली आणि त्यावर भरतकाम केलेली बॉर्डर लावून घेतली की त्यांना डिझायनर साड्यांसारखा लूक यायचा. या लेस किंवा बॉर्डरपासून प्रेरणा घेत पॅचवर्कसुद्धा बाजारात आले आहेत.

### कलाकुसर

एखाद्या ड्रेसला शोभा कशी येते तर त्यावर असणाऱ्या कलाकुसरेमुळे. बाजारात मिळणाऱ्या या ड्रेसेसची किंमत त्यावरील खडे, मणी यांच्या कलाकुसरीवर अवलंबून असते. पण तुम्हाला साध्या ड्रेसला सुद्धा अशा दुकानात मिळणाऱ्या

कपड्यांसारखा लूक द्यायचा असेल तर पॅचेसचा विचार करू शकता.

### विविध राज्यांचे पॅचवर्क

भारतातील प्रत्येक राज्याची वेगळी अशी कला आहे. ही कलाकुसर केलेली पॅचवर्क तुम्ही वापरू शकता. यात राजस्थानी, गुजराती वर्क असलेले आरसे, कवडे, रेशीम, गोंडे लावून तयार केलेले पॅचवर्क देखील आहेत.

### पारंपरिक नक्षी

काही पॅचवर्कमध्ये काथा वर्क, मिनाकाम अशा पारंपरिक नक्षी असलेले पॅचवर्कदेखील पाहायला मिळतात. पारंपरिक प्रकारचे नक्षीकाम केलेले पॅचवर्क हे किमतीने थोडे जास्त असतात. जर कमीत कमी किमतीत पॅचवर्क हवे असेल तर तुम्ही मशीनवर तयार केलेले पॅचवर्क पाहू शकता. त्याशिवाय ब्लॉक प्रिंट असलेले पॅचवर्क देखील आहेत. हे साधारण चौकोनी आकाराच्या छोट्या तुकड्यामध्ये येतात. या ब्लॉक प्रिंट कॉटनच्या ड्रेसवर अधिक शोभून दिसतात. पैठणीवर असणाऱ्या मोरांचे देखील पॅचवर्क आले आहे.

### चिमुकल्यांसाठी कार्टून पॅचवर्क

हे पॅचवर्क फक्त महिलांसाठी आहेत असे नाही. तर लहानग्यांच्या कपड्यांवर लावण्यासाठी देखील कार्टुन पॅचवर्क बाजारात मिळतात. तसेच कॉलेजला जाणाऱ्या तरुण-तरुणींची आवड लक्षात घेऊन फंकी पॅचवर्क किंवा एखाद्या फुटबॉल क्लबचे लोगो असलेले पॅचवर्क देखील मिळतात. हे पॅचवर्क जीन्सवर देखील तुम्ही लावू शकता. त्याचप्रमाणे पॅचवर्क तुम्ही साडी, ब्लाऊज, टॉप, ड्रेसेस इतकेच नाही तर चपला किंवा पर्स, घरच्या उशा सजवण्यासाठी देखील वापरू शकता.

### रेडिमेट पॅचेस

ड्रेसच्या गळ्याकडील किंवा हाताकडील भागात कलाकुसर केलेले रेडिमेड पॅचेस असतात. हे पॅचेस फक्त ड्रेस शिवताना व्यवस्थित बसवून घ्यायचे. त्यामुळे ड्रेसेला एक छान लूक येतो.

### नेट पॅचवर्क

सोनेरी किंवा चंदेरी रंगाच्या नेटचे पॅचवर्क किंवा रेशीम दोरे वापरून केलेले पॅचवर्क सामान्य आहे, लेसच्या दुकानात हे पॅचवर्क कुठेही उपलब्ध होतात. पॅचवर्क तुम्ही साडीच्या ब्लाऊजला किंवा एखाद्या फॅन्सी टॉपचा गेटअप वाढवण्यासाठी देखील लावू शकता. या पॅचवर्कपेक्षाही वेगवेगळे प्रयोग करू पाहणाऱ्यासाठी वेगवेगळे प्रकार आहेत.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, शनिवार 4 जुलै 2026



# मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत मतदारांनी सहभागी व्हावे - राजकिशोर मोदी

## पुनरीक्षण मोहिमेंतर्गत मोदी यांच्या निवासस्थानी उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार व मुख्याधिकाऱ्यांची गृहभेट

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्याच्या उद्देशाने राज्यभर मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन प्रत्येक मतदाराची माहिती पडताळून गणना प्रपत्र भरून घेत आहेत. या महत्त्वपूर्ण लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग नोंदवून आपली अद्ययावत माहिती बीएलओंना उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष, तथा अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन तथा अंबाजोगाई विकास आघाडीचे प्रमुख राजकिशोर मोदी यांनी केले आहे.

या विशेष मोहिमेच्या जनजागृतीचा एक भाग म्हणून उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे, तहसीलदार विलास तरंगे, नायब तहसीलदार तसेच नगरपरिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी श्री.देशपांडे यांनी राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी भेट देऊन मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी त्यांच्या कुटुंबातील मतदारांची माहिती तपासण्यात आली, आवश्यक गणना प्रपत्र भरून घेण्यात आले तसेच माहितीचे पुनरीक्षण करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांनी सांगितले की, मतदार यादीतील त्रुटी दूर करून ती अधिक विश्वासार्ह करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने ही विशेष मोहीम हाती घेतली आहे. प्रत्येक पात्र नागरिकाचे नांव मतदार यादीत समाविष्ट होणे, चुकीची अथवा अपूर्ण माहिती दुरूस्त करणे आणि मृत अथवा स्थलांतरित मतदारांची नांवे नियमानुसार वगळणे, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे नागरिकांनी बीएलओंना आवश्यक माहिती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून देत प्रशासनाला सहकार्य करावे. यावेळी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा सर्वात महत्त्वाचा अधिकार आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने मतदार यादीत आपले नांव योग्य प्रकारे नोंदलेले आहे की नाही, याची खात्री करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने राबविलेली ही मोहीम नागरिकांच्या सोयीसाठी असून बीएलओ स्वतः घरोघरी येऊन माहिती संकलित करीत आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रकारची गैरसमजूत न बाळगता प्रत्येकाने या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद द्यावा. या मोहिमेद्वारे मतदारांच्या नांवातील दुरूस्ती, पत्ता बदल, विवाहानंतर आडनावातील बदल, मृत मतदारांची नावे वगळणे, नवीन पात्र मतदारांची नोंदणी, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर झालेल्या मतदारांची माहिती अद्ययावत करणे तसेच इतर आवश्यक बदलांची प्रक्रिया बीएलओंच्या माध्यमातून केली जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबातील सर्व मतदारांची माहिती काळजीपूर्वक तपासून आवश्यक ती माहिती अधिकाऱ्यांना उपलब्ध करून द्यावी. बीएलओ नागरिकांच्या घरी भेट देऊन अधिकृत ॲपच्या माध्यमातून सर्व माहिती ऑनलाइन नोंदविणार आहेत. यासाठी मतदारांनी मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक (स्वेच्छेने), अलीकडील छायाचित्र, रहिवासी पत्त्याचा पुरावा तसेच आवश्यकतेनुसार इतर कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. याशिवाय भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर आणि संबंधित ऑनलाइन सुविधांद्वारेही मतदारांना स्वतःची माहिती पडताळण्याची व आवश्यक बदलांसाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे.



मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. ३० जून ते २९ जुलै या कालावधीत बीएलओंच्या घरोघरी भेटी व गणना प्रपत्र संकलन, २९ जुलैपर्यंत मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण, ५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करणे, ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारणे, त्यानंतर ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर या कालावधीत प्राप्त दावे व हरकतींची सुनावणी व निकाली काढण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी मतदार यादी अचूक असणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे अंबाजोगाई शहर व परिसरातील सर्व नागरिकांनी प्रशासनाच्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बीएलओंना आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत. प्रत्येक पात्र नागरिकाचे नांव मतदार यादीत समाविष्ट होणे आणि प्रत्येक मतदाराची माहिती अद्ययावत राहणे हीच या मोहिमेची खरी यशस्वीता ठरेल, हि मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी अंबाजोगाई विकास आघाडीचे उपनगराध्यक्ष, गटनेते, विविध विषय समित्यांचे सभापती, सर्व नगरसेवक, सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी प्रशासनाला सर्वोतोपरी सहकार्य व मतदारांची जनजागृती करावी असे आवाहन अंबाजोगाई विकास आघाडीचे प्रमुख राजकिशोर मोदी यांनी केले.

# उपक्रमशील शिक्षक अशोक नावंदे यांचा आदर्श उपक्रम

## सामाजिक बांधिलकीचा दिला संदेश ; वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप

**परळी/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, टोकवाडी येथील उपक्रमशील, विद्यार्थीप्रिय व आदर्श शिक्षक श्री अशोक नावंदे यांचा वाढदिवस शाळेत उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधत त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करून शिक्षणाप्रती असलेली आपली बांधिलकी आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा आदर्श संदेश दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी श्री नावंदे सरांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लागावा या उदात्त हेतूने श्री नावंदे यांनी मुख्याध्यापक दौंड सर यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक साहित्याचे व खाऊचे वाटप केले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊचेही वितरण करण्यात आले. त्यामुळे



विद्यार्थ्यांच्या चेहर्यावर आनंदाचे हास्य फुलले.

या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक दौंड सर, सर्व शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांप्रती असलेले प्रेम, सेवाभावी वृत्ती आणि समाजाभिमुख विचार जपणार्या श्री अशोक नावंदे यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले आणि त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

वाढदिवस हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची संधी आहे, हा संदेश श्री अशोक नावंदे यांच्या या उपक्रमातून प्रभावीपणे अधोरेखित झाला.

# काबरा यांच्या शक्तिसूत्र पुस्तकाचे लोकार्पण :सशक्त जीवनाचा 30 सूत्रांचा दाखवला मार्ग, संवाद, अनुभव आणि निरीक्षणांच्या आधारे 30 साधी पण प्रभावी जीवनसूत्रे मांडली

**जालना |** अधिक सक्षम, आनंदी आणि सशक्त जीवन जगण्यासाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या 'शक्तिसूत्र' या पुस्तकाचे जालना येथील एमआयडीसी परिसरातील भाग्यलक्ष्मी स्टीलच्या सभागृहात प्रकाशन करण्यात आले. भाग्यलक्ष्मी स्टीलच्या संचालिका, लेखिका, समुपदेशक मीता नितीन काबरा यांनी हे पुस्तक लिहिले आहे. विशेष म्हणजे, 'आई हीच जीवनातील पहिली गुरु' या भावनेतून पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या आईच्या हस्ते करण्यात आले.

पुस्तकाच्या निर्मितीमागील प्रेरणा सांगताना काबरा म्हणाल्या की, अनेक वर्षे आनंद, समाधान आणि यशाची उत्तरे त्या स्वतःच्या बाहेर शोधत होत्या. मात्र अनुभव, निरीक्षण, शिक्षण आणि वैयक्तिक विकासाच्या प्रवासातून त्यांना जाणवले की, खरा आनंद, आत्मविश्वास आणि अंतर्बल हे बाहेर नसून प्रत्येक व्यक्तीच्या अंतरंगातच दडलेले असते. त्या अंतर्गत शक्तीची पुन्हा जाणीव करून देणारी काही सोपी, व्यवहार्य आणि प्रभावी जीवनतत्त्वे लोकांपर्यंत पोहोचावीत, या उद्देशातून 'शक्तिसूत्र' या पुस्तकाची निर्मिती झाली. या पुस्तकामध्ये विविध क्षेत्रांतील असंख्य व्यक्तींशी झालेल्या संवाद, अनुभव आणि निरीक्षणांच्या आधारे ३० साधी पण प्रभावी जीवनसूत्रे मांडण्यात आली आहेत.

दैनंदिन जीवनातील ताणतणाव, नातेसंबंध, आत्मविश्वास, सकारात्मक विचार, मानसिक सक्षमता आणि वैयक्तिक विकास यांसारख्या विविध पैलूंवर मार्गदर्शन करणारे हे पुस्तक आहे. हे पुस्तक प्रामुख्याने महिलांना केंद्रस्थानी ठेवून लिहिले असले, तरी त्यातील विचार, जीवनमूल्ये आणि सकारात्मक दृष्टिकोन प्रत्येक वयोगटातील स्त्री-पुरुषांसाठी तितकेच उपयुक्त ठरतील, असा विश्वास मीता काबरा यांनी व्यक्त केला. या प्रसंगी उद्योग, साहित्य, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

# जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक तथा प्राचार्यपदी सय्यद ए. डी. तर उपमुख्याध्यापकपदी गवळी बी. आर.

**आष्टी | प्रतिनिधी**

तालुक्यातील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, धानोरा येथील मुख्याध्यापक तथा प्राचार्यपदी श्री. सय्यद ए. डी. यांची तर उपमुख्याध्यापकपदी श्री. गवळी आर बी यांची नियुक्ती झाल्याबद्दल विद्यालयाचा स्टाफ, मित्र परिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी जीवन क्लिनिकचे डॉ. रज्जाक सय्यद, रा. प. महामंडळाचे वाहक कैलास (भाऊ) मोरे, ज्येष्ठ पत्रकार प्रा. निसार शेख, माजी सभापती अंकुशराव चव्हाण, माजी सरपंच राजाभाऊ शेळके, ह भ प परमेश्वर गायकवाड महाराज, आजिनाथ राव शेळके पाटील डॉक्टर वैभव तोडकर, इर्शादभाई शेख, संदीप झांजे सर, नितीन मोरे, सर होळकर सर, गायकवाड सर, एस आर गव्हाणे सर, एस. पी . अडागळे सर, एकशिंगे सर, निजाम पठान सर, घोडेस्वार सिताराम सर व विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच मित्र परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कार समारंभात उपस्थित मान्यवरांनी नवनियुक्त मुख्याध्यापक श्री. सय्यद आणि



उपमुख्याध्यापक श्री. गवळी यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचावणे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शिस्त, संस्कार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य देत विद्यालयाची उज्ज्वल परंपरा अधिक बळकट करण्यासाठी त्यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

मुख्याध्यापक श्री. सय्यद यांनी सत्काराबद्दल उपस्थित सर्वांचे आभार मानत शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि व्यवस्थापन यांच्या सहकार्याने विद्यालयाच्या प्रगतीसाठी सातत्याने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. उपमुख्याध्यापक श्री. गवळी यांनीही विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, शैक्षणिक उपक्रम आणि गुणवत्तावृद्धीसाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली. छोटेखानी कार्यक्रम आनंददायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी नवनियुक्त मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देत विद्यालय शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात अधिक प्रगती करेल, असा विश्वास व्यक्त केला.

